ePaper
अभिनेत्री प्राजक्ता माळी सुरेश धस यांच्याविरोधात महिला आयोगात तक्रार करणार!
‖ वर्ष - 8 । अंक -169 ‖ UDYAM-MH-26-0158827 ‖



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत

- दीप्ती शर्माने घडवला इतिहास!
- तू अशी काय चूक केलीस!
- आप -काँग्रेस यांच्यात वादाची ठिणगी!
- थर्टीफस्टला मिळणार केवळ चार पॅक!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 28 डिसेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### बीडवरुन वातावरण तापलं, महायुतीचे सावध पाऊल

# धनंजय मुंडेचा राजीनामा घेणार ?

## धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय पक्षश्रेष्ठीच घेतील

। मुंबई / बीड । महाईन्यूज

**अधिवेशनाच्या एक दिवस आधी मंत्रिमंडळाचा विस्तार आणि अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी खात्याचे वाटप करण्यात आले असले तरी अजूनही पालकमंत्रिपदाचे वाटप करण्यात आलेले नाही. त्यात संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडचे पालकमंत्रिपदही चांगलेच चर्चेत आले आहे. मागील सरकारमध्ये धनंजय मुंडे बीडचे पालकमंत्री होते. मात्र या वेळी पालकमंत्री कोण होणार, याकडे लक्ष आहे.**



विरोधकांकडून धनंजय मुंडे यांच्यावर सातत्याने आरोप होत असल्याने ते पुन्हा पालकमंत्री होणार का हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. अशावेळी बीडच्या पालकमंत्रिपदाबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी महत्वाचे व्यक्तव्य केले आहे. ‘बीडचा पालकमंत्री कोण असणार, याबाबतचा निर्णय मी, अजित पवार आणि एकनाथ शिंदे मिळून घेऊ. बीडमध्ये कोणाची दादागिरी चालू देणार नाही,’ असे फडणवीस यांनी म्हटले आहे.

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत उलटसुलट चर्चा सुरू असताना महायुतीच्या नेत्यांकडूनही शुक्रवारी सूचक विधान करण्यात आले. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील, असे विधान नेत्यांकडून करण्यात आले आहे.

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करण्यात आले होते. त्यानंतर त्यांची हत्या करण्यात आली. या घटनेने राज्यभरात खळबळ उडाली. संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर आता महाराष्ट्रात वातावरण चांगलेच तापले आहे. देशमुख यांच्या हत्येनंतर आरोप-प्रत्यारोप सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

दरम्यान या प्रकरणानंतर विरोधकांकडून सातत्याने मंत्री धनंजय मुंडे यांच्या कोंडीचा प्रयत्न सुरू आहे. त्यांच्या राजीनाम्याची मागणीही करण्यात येत आहे. त्यावर महायुतीच्या नेत्यांकडून सूचक प्रतिक्रिया देण्यात आली आहे. ‘धनंजय मुंडे यांच्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील. यावर आम्ही भाष्य करणे योग्य नाही,’ असे गिरीश महाजन यांनी म्हटले आहे. तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनीही अशीच प्रतिक्रिया दिली आहे. धनंजय मुंडे यांच्याबाबत पक्षश्रेष्ठी निर्णय घेतील, असे मुश्रीफ यांनी म्हटले आहे.

### ‘बीडमधील घटनांमुळे तणाव’

‘बीडमध्ये ज्या घटना घडत आहेत त्यामुळे जातीय तणाव वाढतो. त्यामुळे या घटना गांभीर्याने घ्यायला हव्यात. अशा ठिकाणी कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी चांगल्या अधिकाऱ्यांची गरज आहे,’ असे मत सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी शुक्रवारी व्यक्त केले. ‘बीडच्या घटनेकडे राजकीय दृष्टीने पाहू नका. धनंजय मुंडे, सुरेश धस यांची नावे जोडू नका. या घटनेला राजकीय वळण देता कामा नये,’ असेही मत त्यांनी व्यक्त केले.

### काय म्हणाले संजय शिरसाट

प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले. ‘कोणतीही घटना घडल्यानंतर संबंधित ठिकाणचे अधिकारी माझ्या ओळखीचे आहेत, त्यातून मी सुटेन, असे गुन्ह्यातील आरोप सांगतात. त्यामुळे येथे चांगले अधिकारी असणे गरजेचे आहे. अनेक माफिया, गुंड, वाळूमाफिया हे तिथे आहेत. त्यांची एक साखळीच तयार झालेली आहे. माझ्या दौऱ्यातही या गोष्टी समोर आल्या आहेत. त्यामुळे यावर योग्य वेळी कारवाई होणे गरजेचे आहे. यात काही मुले पकडली जातात, मात्र; ही मुले २४ वर्षांच्या आतील आहेत,’ याकडेही सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी लक्ष वेधले.

### रक्षकचं बनला भक्षक, लोणावळ्यातील घटनेने संताप

## मद्यधुंद पोलीसाचे पाच वर्षाच्या चिमुरडीसोबत अश्लील चाळे

। लोणावळा।
प्रतिनिधी : महाईन्यूज

लोणवळ्यामधून एक संतापजनक बातमी समोर येत आहे. विसापूर किल्ल्याच्या पायथ्याला एका पाच वर्षीय चिमुरडीशी कर्तव्यावर असलेल्या पोलिसानेच अश्लील चाळे केल्याचे समोर आले आहे. कल्याणमधील 13 वर्षीय मुलीवर अमानुष अत्याचार करून तिची हत्या करण्यात आली. पोलिसांनी चक्र फिरवून



आरोपी विशाल गवळी याला अटक केली. ही घटना ताजी असतानाच लोणावळ्यातील या घटनेने समाजमन हेलावले आहे. रक्षकच भक्षक बनल्याने विश्वास तरी कोणावर ठेवावा असा सवाल विचारण्यात येत आहे. आरोपी पोलीस शिपाई सचिन सस्ते याला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. नाताळाच्या दिवशी ही घटना घडली.

### आरोपी पोलीस मद्यधुंद

सापूर किल्ल्याच्या पायथ्याला हा प्रकार घडला. कर्तव्यावर असताना हा पोलीस दारूच्या नशेत होता, याचं नशेत त्याने पाच वर्षीय चिमुरडीसोबत अश्लील चाळे केलेत. याप्रकरणी सचिन सस्तेला लोणावळा ग्रामीण पोलिसांनी बेड्या ठोकल्यात. नाताळची सुट्टी असल्यानं पर्यटक विसापूर किल्ल्यावर गर्दी करत होते. म्हणून नराधम पोलीस सस्ते तिथं बंदोबस्तावर होता. तिथल्याच एका हॉटेलमधून भाकरी घेतली अन त्याने जेवण केलं. त्याच भाकरीचे बिल द्यायला तो हॉटेलमध्ये आला, तेंव्हा मात्र तो दारूच्या नशेत होता. त्यावेळी तिथं पाच वर्षीय चिमुरडीला सस्ते ने पाहिले. लघुशंकेचा बहाणा करून तो हॉटेलच्या मागे गेला अन चिमुकलीसोबत अश्लील चाळे केले. मुलीने विरोध केला, मग तुला चॉकलेट देतो हे कोणाला सांगू नकोस असं तो तिला म्हणाला. मात्र घडला प्रकार मुलीने आईला सांगितला अन या नराधम पोलीस रस्तेचं बिंग फुटलं. ज्या लोणावळा ग्रामीण पोलीस स्टेशनमध्ये तो कार्यरत होता, त्याचं पोलिसांनी त्याला अटक केली.

# बांगलादेशातून भारतात घुसखोरी!

## घुसखोरी रोखण्यासाठी मिळून काम करण्याची आवश्यकता : डॉ. मजुमदार

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'मूलतत्त्ववादामुळे बांगलादेशातील नागरिक भारतात घुसत आहेत. आतापर्यंत जे काही समोर आले आहे, ते हिमनगाचे टोक आहे. बांगलादेशातून प्रचंड प्रमाणात घुसखोरी होत आहे,' असा दावा केंद्रीय शिक्षण आणि ईशान्य प्रदेश विकास राज्यमंत्री डॉ. सुकांत मजुमदार यांनी शुक्रवारी केला. 'घुसखोरी रोखण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारने मिळून काम करण्याची आवश्यकता आहे.**



मात्र, राज्य सरकारकडून जे सहकार्य मिळायला हवे, ते मिळताना दिसत नाही,' अशी टीकाही त्यांनी केली.पुण्यात एका खासगी शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमासाठी डॉ. मजुमदार शुक्रवारी पुण्यात आले होते. कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'पश्चिम बंगालमधील परिस्थिती चिंताजनक आहे. बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत. केवळ हिंदूच नाही, तर ख्रिश्चनांवरही अत्याचार होत आहेत. बांगलादेश आणि भारत यांच्यातील पश्चिम बंगाल येथील सीमा कुंपणाचे काम अजून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे बांगलादेशातून घुसखोरी होत आहे. त्यामुळे भारतातील अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण होत आहे,' असे ते म्हणाले.मजुमदार म्हणाले, 'आमचे सरकार येण्यापूर्वीचे लोक ईशान्य भारतात केवळ जाऊन यायचे. आमचे सरकार आल्यावर तत्कालीन पक्षाध्यक्ष अमित शहा यांनी वारंवार ईशान्य भारताचे दौरे केले. आधी आसाममध्ये सतत बॉम्बस्फोट व्हायचे. आम्ही तेथील आक्रमक गटांशी सातत्याने चर्चा केली. शांतता निर्माण झाल्याशिवाय विकास होऊ शकत नाही. त्यामुळे आम्ही आधी शांतता निर्माण करण्यावर भर दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ५४ मंत्रालयांच्या एकूण आर्थिक अंदाजपत्रकाच्या दहा टक्के खर्च ईशान्य भारतासाठी खर्च करण्याचा निर्णय घेतला. आता उद्योगांना गुंतवणुकीसाठी ईशान्य भारतात आणण्यासाठी वेगवेगळ्या राज्यांमध्ये कार्यक्रम करण्यात येत आहेत. या माध्यमातून अनेक सामंजस्य करार होऊन ईशान्य भारतात गुंतवणूक होत आहे. अलीकडेच टाटा समूहाने मायक्रोचिप निर्मितीचा उद्योग गुवाहाटीजवळ उभारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे ईशान्य भारताची आर्थिक ताकद वाढण्यास मदत होईल. ईशान्य भारताचे संपूर्ण चित्र बदलून जाईल. ईशान्य भारताच्या क्षमतेचा अद्याप वापर झालेला नाही. जगातील तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता होण्यासाठी ईशान्य भारत आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे, तेथे गुंतवणूक होणे महत्त्वाचे आहे.''कायदा आणि सुव्यवस्था हा गृह खात्याचा विषय आहे. माझ्याकडे ईशान्य भारताच्या विकासाचे काम आहे. माझ्या खात्याचा निधी कसा वापरला जाईल, याकडे लक्ष देणे माझे काम आहे. त्यामुळे मणिपूरसंदर्भात बोलण्यासाठी मी योग्य व्यक्ती नाही,' असे सांगून सुकांत मजुमदार यांनी मणिपूरमधील स्थितीवर बोलण्याचे टाळले.मात्र, राज्य सरकारकडून जे सहकार्य मिळायला हवे, ते मिळताना दिसत नाही.

### बंगालमधील परिस्थिती चिंताजनक

पुण्यात एका खासगी शिक्षण संस्थेच्या कार्यक्रमासाठी डॉ. मजुमदार शुक्रवारी पुण्यात आले होते. कार्यक्रमानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'पश्चिम बंगालमधील परिस्थिती चिंताजनक आहे. बांगलादेशात हिंदूंवर अत्याचार होत आहेत. केवळ हिंदूच नाही, तर ख्रिश्चनांवरही अत्याचार होत आहेत. बांगलादेश आणि भारत यांच्यातील पश्चिम बंगाल येथील सीमा कुंपणाचे काम अजून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे बांगलादेशातून घुसखोरी होत आहे. त्यामुळे भारतातील अंतर्गत सुरक्षेला धोका निर्माण होत आहे,' असे ते म्हणाले.मजुमदार म्हणाले, 'आमचे सरकार येण्यापूर्वीचे लोक ईशान्य भारतात केवळ जाऊन यायचे. आमचे सरकार आल्यावर तत्कालीन पक्षाध्यक्ष अमित शहा यांनी वारंवार ईशान्य भारताचे दौरे केले.

# पुण्या मुंबईबाहेर 'आयटी'चा विस्तार!

## नागपूर, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगरला पसंती

। पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यातून होणाऱ्या सॉफ्टवेअर निर्यातीत पुणे आणि मुंबईचा वाटा कायम सर्वाधिक राहिला आहे. आता इतर शहरांतही माहिती तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्राचा विस्तार होऊ लागला असून, त्यांच्या सॉफ्टवेअर निर्यातीत सातत्यपूर्ण वाढ दिसून येत आहे. गेल्या पाच वर्षांत राज्यातील काही शहरांत सॉफ्टवेअर निर्यातीत ५० टक्क्यांहून अधिक वाढ नोंदविण्यात आली आहे.**



देशातील सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्कमधून (एसटीपी) होणाऱ्या सॉफ्टवेअर निर्यातीची आकडेवारी केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लोकसभेत नुकतीच मांडली. या आकडेवारीनुसार, राज्यातील सॉफ्टवेअर निर्यातीत पुण्याचे अव्वल स्थान कायम असून, पुणे दुसऱ्या स्थानी आहे. याच वेळी राज्यातील नागपूर, नाशिक, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांनीही चमकदार कामगिरी केली आहे. त्यामुळे पुणे आणि मुंबईबाहेर हळूहळू आयटी क्षेत्राचा विस्तार होऊन ती रूजत असल्याचे समोर आले आहे.गेल्या पाच वर्षांचा विचार करता राज्यातील काही शहरांमधील सॉफ्टवेअर निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. नागपूरमधून आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये ४०५ कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात झाली होती. ती पाच वर्षांत ५० टक्क्यांहून अधिक वाढून २०२३-२४ मध्ये ६४६ कोटी रुपयांवर पोहोचली. नाशिकमधून २०१९-२० मध्ये २१० कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात झाली होती. ती पाच वर्षांत अडीच पटींनी वाढून ४९५ कोटी रुपयांवर पोहोचली. कोल्हापूरमधून २०१९-२० मध्ये १२८ कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात झाली होती आणि ती २०२३-२४ मध्ये ५० टक्क्यांनी वाढून १८९ कोटी रुपयांवर पोहोचली. छत्रपती संभाजीनगरमध्ये २०१९-२० मध्ये सॉफ्टवेअर निर्यात ७२.८५ कोटी रुपये होती आणि ती २०२३-२४ मध्ये जवळपास दुपटीने वाढून १३२ कोटी रुपयांवर पोहोचली. राज्यात पुणे, मुंबई सोडून इतर शहरांत आयटी क्षेत्राचा विस्तार होताना दिसत आहे. मात्र, हे प्रमाण अतिशय कमी आहे. छोट्या शहरांत आयटी क्षेत्राचा विस्तार व्हावा यासाठी केवळ जमीन देऊन उपयोग नाही, तर मोठ्या प्रमाणात प्रोत्साहनपर सवलती द्याव्या लागतील. याचबरोबर या उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे लागेल. त्यातून आयटी क्षेत्राचे राज्यात विकेंद्रीकरण शक्य होईल. या आकडेवारीनुसार, राज्यातील सॉफ्टवेअर निर्यातीत पुण्याचे अव्वल स्थान कायम असून, पुणे दुसऱ्या स्थानी आहे. याच वेळी राज्यातील नागपूर, नाशिक, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या शहरांनीही चमकदार कामगिरी केली आहे. त्यामुळे पुणे आणि मुंबईबाहेर हळूहळू आयटी क्षेत्राचा विस्तार होऊन ती रूजत असल्याचे समोर आले आहे.

### 405 कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात

गेल्या पाच वर्षांचा विचार करता राज्यातील काही शहरांमधील सॉफ्टवेअर निर्यातीत मोठी वाढ झाली आहे. नागपूरमधून आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये ४०५ कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात झाली होती. ती पाच वर्षांत ५० टक्क्यांहून अधिक वाढून २०२३-२४ मध्ये ६४६ कोटी रुपयांवर पोहोचली. कोल्हापूरमधून २०१९-२० मध्ये १२८ कोटी रुपयांची सॉफ्टवेअर निर्यात झाली होती आणि ती २०२३-२४ मध्ये ५० टक्क्यांनी वाढून १८९ कोटी रुपयांवर पोहोचली. छत्रपती संभाजीनगरमध्ये २०१९-२० मध्ये सॉफ्टवेअर निर्यात ७२.८५ कोटी रुपये होती आणि ती २०२३-२४ मध्ये जवळपास दुपटीने वाढून १३२ कोटी रुपयांवर पोहोचली.

## राष्ट्रवादी मध्यवर्ती कार्यालयात वाहण्यात आली आंदरांजली

# डॉ. मनमोहन सिंग यांना श्रध्दांजली!

### डॉ. मनमोहन सिंग हे भारताच्या जागतिकीकरणाचे जनक: माजी महापौर योगेश बहल

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) मध्यवर्ती कार्यालय, खराळवाडी, पिंपरी येथे सकाळी ११.३० वा. शहराध्यक्ष मा.योगेश मंगलसेन बहल यांच्या हस्ते डॉ.मनमोहन सिंग यांच्या प्रतिमेस पुष्प हार अर्पन करून आदरांजली वाहण्यात आली.**



यावेळी बहल म्हणाले की, डॉ. मनमोहन सिंग यांनी १९४८ साली पंजाब विद्यापीठातून त्यांनी उच्च शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांनी केम्ब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र या विषयात प्रथम श्रेणीमध्ये पदवी प्राप्त केली. त्यानंतर ऑक्सफोर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र या विषयात डी फील संपादन केली. तत्कालीन पंतप्रधान असतांना, डॉ.मनमोहन सिंहांच्या आधार कार्ड संकल्पनेचं कौतुक संयुक्त राष्ट्र अर्थात यूएनने केलं होतं, तसेच डॉ. मनमोहन सिंग यांच्या कार्यकाळातच 'राईट टू एज्युकेशन' (RTE) अर्थात शिक्षणाचा अधिकाराचा कायदा हा एक महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला, याअंतर्गत ०६ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार निश्चित करण्यात आला, आर्थिक दृष्ट्या दुर्बल समाजातील मुलांना शैक्षणिक सवलततिचा निर्णय घेतला.

तसेच २००५ मध्ये डॉ. मनमोहन सिंग यांनी माहिती अधिकार कायदा (RTI) संमत करून नागरिकांना सरकारी अधिकाऱ्यांकडून माहिती घेण्याचा अधिकार दिला. त्यांनी महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना राष्ट्रीय स्तरावर नेली, आणि त्यास महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजना अर्थात मनरेगा असं नामकरण करण्यात आलं.

जागतिकीकरण, उदारीकरण आणि खासगीकरण या जागतिकीकरणाचा निर्णय घेतला आणि भारतीय बाजारपेठ जगासाठी खुली केली. २०११ साली तत्कालीन पंतप्रधान असताना डॉ.मनमोहन सिंग यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड शहराला भारत देशातून "बेस्ट सिटी २०११" चा पुरस्कार देण्यात आला होता. तसेच डॉ. मनमोहन सिंग हे भारताचे १३ वे आणि शीख समाजातील पहिले पंतप्रधान होते, पंतप्रधान पदाचा कार्यभार स्वीकारताना देश आर्थिक व बेरोजगारीच्या संकटामध्ये देश असताना जगातील प्रसिद्ध अर्थज्ज्ञांमध्ये डॉ. मनमोहन सिंग यांची गणना व एक हुशार व्यक्तिमत्व म्हणून त्यांची पंतप्रधान पदी निवड करण्यात आली होती. अशा या महान व्यक्तीस त्यांच्या पवित्र स्मृतीस राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पिंपरी चिंचवड शहर (जिल्हा) च्यावतीने आदरांजली वाहतो.

सदर कार्यक्रमानंतर माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे तैल्यचित्र पिंपरी चिंचवड महानगरपालिका सभागृहामध्ये असाव असा ठराव सर्वानुमते शहराध्यक्ष योगेश बहल यांनी मांडला त्यास महिला अध्यक्षा कविता आल्हाट तसेच कार्याध्यक्ष संतोष बारणे यांनी अनुमोदन दिले.

#### यांची उपस्थिती....

यावेळी शहराध्यक्ष योगेश बहल, कार्याध्यक्ष संतोष बारणे, महिला अध्यक्ष कविता आल्हाट, युवक अध्यक्ष शेखर काटे, माजी नगरसेवक राजू बनसोडे, प्रकाश सोमवंशी, ओबीसी अध्यक्ष विजय लोखंडे, श्रीधर वाल्हेकर, प्रदेश सरचिटणीस ज्ञानेश्वर कांबळे, राजेंद्रसिंग वालिया, ओबीसी प्रदेश कार्याध्यक्ष सचिन औटे, महिला वरिष्ठ कार्याध्यक्ष कविता खराडे, अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष युसुफ कुरेशी, सामाजिक न्याय अध्यक्ष संजय औसरमल, पिंपरी विधानसभा युवक अध्यक्ष अक्षय माछरे, अकबर मुल्ला, दीपक साकोरे, असंघटीत कामगार अध्यक्ष रवींद्र ओव्हाळ, बाबुराव शितोळे, चिंचवड विधानसभा अध्यक्षा संगीता कोकणे, सेवादल अध्यक्ष महेश झपके, युवक कार्याध्यक्ष तुषार ताम्हणे, बचत गट अध्यक्षा ज्योती गोफणे, स्मिता मस्करे, गोरोबा गुजर, माऊली मोरे, प्रमोद साळवे, कुमार कांबळे, बाबासाहेब चौधरी, समशेर सिंग माथेरू, जगजीत सिंग, सुरेंद्र सिंग बाला, जितेंद्र सिंग लोहित, संकेत लोखंडे, सचिन वाल्हेकर, कार्यालयीन संपर्क प्रमुख धनाजी तांबे, सुनिल अडागळे इत्यादी पदाधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

---

## नाशिक महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर!

### मुख्य रस्त्यांवरील वाहनांची गर्दी कमी होऊन वाहतूक कोंडी होणार कमी

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**त्रिवेणीनगर मार्गे भक्ती शक्ती चौकातून नाशिक महामार्गाला जोडणाऱ्या ५५० मीटर लांबी असलेल्या रस्त्याचे काम प्रगतीपथावर असून सध्या ५० टक्के काम पूर्ण झाले आहे. या महत्त्वपूर्ण प्रकल्पाचा उद्देश पुणे-नाशिक महामार्ग, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि निगडी भक्ती शक्ती चौक यादरम्यान वाहतूक दळणवळण सुधारणे आणि शहरातील वाहतूक कोंडी कमी करणे हा आहे. या प्रकल्पातील मंजूर आराखड्यातील २५०X७५ मीटर भूभागाच्या ताब्याचा प्रश्न मिटल्यानंतर जलद गतीने प्रकल्पाचे काम पुर्ण करण्याचे महापालिकेचे नियोजन आहे.**



मंजूर विकास आराखडयानुसार हा रस्ता ७५ मीटर रुंदीचा असून सद्यस्थितीत ३७ मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्याचे काम सुरू आहे. त्यामध्ये १२ मीटर रुंदीच्या दोन लेन, मध्यभागी ९ मीटर रुंदीचा उच्च क्षमतेचा मास ट्रान्झिट रूट आणि रस्त्यच्या दोन्ही बाजूस २ मीटर रुंदीचे पेव्ह शोल्डर असे या रस्त्याचे नियोजन असणार आहे. सध्या दुहेरी मार्गाचे २७० मीटर लांबीच्या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे.

#### प्रकल्पामुळे नागरिकांना होणारे फायदे

निगडी येथील भक्ती शक्ती चौकातून पुणे–नाशिक आणि जुन्या मुंबई – पुणे महामार्गाला जोडणाऱ्या त्रिवेनीनगरमधील रस्त्याचे काम पुर्ण झाल्यानंतर शहरात मुख्य रस्त्यांवरील अवजड वाहनांची संख्या कमी होणार आहे. यामुळे पर्यावरणपूरक वातावरण टिकवून ठेवण्यास मदत मिळणार असून वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवाशांच्या वेळेची तसेच इंधनाची बचत होणार आहे. तसेच हा रस्ता तळवडे संगणकीय औद्योगिक केंद्र मार्गे चाकण एमआयडीसीला जोडण्यात महत्वाचा दुवा म्हणून काम करणार आहे.

याव्यतिरिक्त, अत्याधुनिक पद्धतीने रस्ता विकसित केल्याने संबंधित भागातील जल:निसारण सुविधा, पावसाळी पाण्याचा निचरा याबाबत निर्माण होणाऱ्या समस्या मार्गी लागणार आहेत. तसेच अद्ययावत तांत्रिक पद्धतीचा वापर केल्याने प्रदूषण कमी होऊन अपघाताचे प्रमाण देखील कमी होणार आहे.

> "मुख्य रस्त्यावरील वाहनांची कोंडी कमी होऊन कमीत कमी वेळेत प्रवास सुखकर व्हावा यासाठी निगडी येथील भक्ती शक्ती चौकातून राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. या रस्त्याच्या काही भागातील जमिनीच्या भूसंपादनाचा प्रश्न सुटल्यानंतर जलद गतीने काम पुर्ण करून हा रस्ता प्रवाशांच्या वापरासाठी खुला करण्याचे महापालिकेचे ध्येय आहे.
> –**प्रमोद ओंभासे,** मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका.

#### दीड ते दोन महिन्यांत रस्त्याचे काम होणार पूर्ण...

रस्त्यासाठीच्या जागेची भूसंपादनाची प्रक्रिया सध्या सुरू असून आवश्यक जमीन संपादित झाल्यानंतर उर्वरित काम दीड ते दोन महिन्यांत पूर्ण करण्याचे महापालिकेचे उद्दिष्ट आहे.



‘स्टेट’मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातल्या जनतेनं असा काही कौल दिला आहे, की सत्ताधाऱ्यांना अपेक्षेपेक्षा जास्त बहुमत आणि विरोधकांना तोंडावर पाडल्याचं चित्र स्पष्ट आहे. देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आणि एकनाथ शिंदे तसेच अजित पवार हे उपमुख्यमंत्री झाले आणि पाच वर्षांसाठी त्यांची चिंता संपली. दुसरीकडं विरोधकांची अशी गोची करून टाकली, की त्यांना विरोधी पक्ष नेतेपद सुद्धा सुखासुखी मिळणार नाही, अशी अवस्था करून टाकली आहे. महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे गटाला 20, काँग्रेस पक्षाला 16 तर शरद पवार गटाला दहा आमदार दिल्यामुळं विरोधी पक्ष नेता कोण याचं उत्तरच मिळू शकत नाही.

# केवढी ही तारांबळ, नाही पुरेसं संख्याबळ, विरोधकांची धावपळ !



विरोधी आघाडीमधील तिघांमध्ये त्यामुळं सध्या तोंडी हाणामाऱ्या सुरू झाल्या आहेत. जुळवाजुळव करण्यासाठी उद्धव ठाकरे यांनी जाऊन देवेंद्र फडणवीस यांना साकडे देखील घातलं ! एकूणच काय विरोधकांची प्रचंड तारांबळ उडली आहे, त्यांच्याकडे पुरेसं संख्याबळ नाही, आणि सत्ताधाऱ्यांच्या उपकाराशिवाय त्यांना तरुणोपाय नाही, हे कटू सत्य आहे.. पण सर्वांना स्वीकारायलाच हवं!

## विरोधकांची दयनीय अवस्था

विरोधकांच्या या अवस्थेबाबत बोलताना माझा एक शिक्षक मित्र मिश्किलपणे सांगून गेला, की जागांचे आकडे म्हणजे परीक्षेत सगळे प्रश्न चुकले असूनही अक्षर चांगले म्हणून मिळालेले गुण आहेत, असे एकदा लक्षात घेतले की मग पुढच्या गोष्टी..! हे आकडे बघून 1985 ची लोकसभा निवडणूक सहजपणे लक्षात येते. त्या निवडणुकीत काँग्रेसचे तब्बल 404 तर विरोधी भाजपाचे केवळ दोन खासदार निवडून आले होते. त्या लोकसभेत विरोधी पक्षात सर्वाधिक जागा होत्या त्या एन. टी. रामाराव यांच्या तेलगू देसम पक्षाला ! त्या देखील होत्या फक्त 33..अखंड आंध्र प्रदेश होता त्या वेळी... भाजपाची स्थापना झाल्यानंतर अटलबिहारी वाजपेयी यांच्या मनातील सर्वसमावेशक भाजपा करण्यासाठी गांधीवादी समाजवाद स्वीकारण्यात आला होता. अर्थातच, तो भलताच महाग पडला होता. पुढे काँग्रेसचे नेते राजीव गांधी यांनी अयोध्येतील मंदिराचे दरवाजे उघडले आणि भाजपाला खरोखर संजीवनी मिळाली. हा संदर्भ म्हणूनच मी दिला. पण, लोकसभा निवडणुकीत फक्त दोन जागा मिळूनही भाजपा ने सपशेल लोटांगण न घालता आणि हाराकिरी न पत्करता पुन्हा नव्या जोमाने पक्षाची बांधणी सुरू केली संघटन वाढवायला आणि लढायला सुरुवात केली आणि त्यानंतर आतापर्यंत एकूण 16 वर्षे भाजपा प्रणित ‘एनडीए’ चे सरकार केंद्रात आहे,

## हे लक्षात घ्यायला हवं!

या उलट बरोबर काँग्रेसची अवस्था आहे. काँग्रेस पक्ष मात्र 2014 च्या 44 नंतर आता 99 वर आहे. पक्ष कसा वाढवायचा याचा कोणताही कार्यक्रम नाही. संसदेत गोंधळ घालणे, एवढा एककलमी कार्यक्रम आमचे सर्वांचे लाडके नेते राहुल यांनी आखला आहे. आता तर भगिनी मदतीला आहेत. माझ्या भावाला कोणी काही बोलायचे नाही, एवढे सांगणे बाकी आहे. वास्तविक, पराभव हे कडू औषध समजून प्राशन केलं तर आजार बरा होण्याचे पाऊल पडू शकते. पण, काँग्रेसचे वयोवृद्ध तरुण मल्लिकार्जुन खर्गे आणि तरुण म्हातारा राहुल गांधी हे औषध तोंडाजवळ आले,की हाताने ढकलून देतात. हे राष्ट्रीय पातळीवर आहे. काँग्रेस प्रणित ‘इंडी’ आघाडी नावापुरती उरली आहे. सत्ताधारी व्हायचं असेल तर आधी चांगला विरोधी पक्ष व्हायला पाहिजे. राष्ट्रीय पातळीवर जोपर्यंत काँग्रेसला चांगला विरोधी पक्ष होता येत नाही, तोपर्यंत तो सत्ताधारी होऊ शकणार नाही. इंदिरा गांधी यांच्यासारखी दिसते म्हणून प्रियंका गांधी वड्रा यांना कोणी देशाच्या नेत्या मानणार नाही. अन्य कोणताही पक्ष राष्ट्रीय पातळीवर विरोधी पक्ष म्हणून उभा राहण्याच्या परिस्थितीत नाही, ही परिस्थिती देखील विरोधकांसाठी भयावह आहे.

## विरोधकांचे नेते तोंड लपवून बसलेले

आता महाराष्ट्रात जी आकडेवारी विरोधी पक्षांची आहे, ती बघितली तर सगळे नेते वाळूत तोंड लपवून बसले आहेत असे दिसेल. ते ईव्हीएम टेंपरिंग वगैरे फार काळ चालणारे नाही. आता पराभव झाला आहे, हे मान्य करुन महाराष्ट्रात मुख्य विरोधी पक्ष म्हणून कोण पुढे येणार हा अभ्यासाचा विषय आहे. कदाचित उद्धव ठाकरे गटा ला 20 जागा आहेत, म्हणून विरोधी पक्षनेता हे पद आणि बंगला द्या,अशी मागणी होऊ शकते. कदाचित कोणी न्यायालयात देखील जाईल. पण विरोधी पक्ष होण्यासाठी आधी संघटनात्मक कामाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. शिवसेना एकत्र असताना एक चांगला विरोधी पक्ष असा आभास तरी होता, तर अखंड राष्ट्रवादी काँग्रेस बहुधा सत्ताधारी बाजूला जात असल्यामुळे विरोधी पक्ष म्हणून त्यांना कोणी मानत नव्हते. काँग्रेस पक्षाची अशीच परिस्थिती आहे.2014 पर्यंत सलग 15 वर्षे सत्ता मिळाल्याने आणि आम्ही फक्त सत्ताधारी होण्यासाठी जन्माला आलो आहोत, की काँग्रेसी मानसिकता असल्यामुळे महाराष्ट्रात विरोधी पक्ष म्हणून काँग्रेसला कितपत भवितव्य आहे, हा मोठा प्रश्न आहे. थोडक्यात सध्या 20,16, 10 या आकड्यांमध्ये गुरफटलेले तीन पक्ष महाआघाडी म्हणून लोकांपुढे येतील,ही शक्यता बरीच कमी आहे किंबहुना अशक्यच वाटते. शाळेच्या प्रगतीपुस्तकात असलेले लाल शेरे कोणी कोणाला दाखवत नाही. इथे तर जाहीर निकाल आहे. फरक एवढाच की तिघांना 10 ते 20 या श्रेणीत जागा मिळाल्याने निवडणुकीचा पेपर तसा तिघांनाही अवघड गेलेला आहे. फक्त पहिल्यापासून तयारी कोण सुरु करणार, हा प्रश्न आहे. शाळेत आजकाल गुण देत नाहीत, पण ज्या काळात देत असत त्या काळात कमी गुण मिळाले की, मास्तर खडूस आहेत, असे पोरं आईबापाला सांगत असे , आणि त्यांना देखील ते पटायचे. इथे निवडणूक आयोगाला मास्तर समजून शिव्या देण्याचा आनंद काही काळ घेतला, की मग,महाराष्ट्रात कोण विरोधी पक्ष होणार आणि नेमके काय करणार, हे लक्षात येईल. पण गेली पाच वर्षे सुरु असलेली बडबड आता ऐकण्याची कोणाची तयारी नाही.

## शहाणपण कधी शिकणार ?

विधानसभा निवडणुकीत एवढी उलथा पालथ होऊन त्यातून कोणीही शिकले नाही, हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे. उद्धव ठाकरे गट हा पूर्णपणे संजय राऊत यांच्या हातात गेला असल्यामुळे रोजची शिवीगाळ आणि बुडत्याचा पाय खोलात, अशी त्यांची अवस्था आहे. काँग्रेसमध्ये नाना पटोले, विजय वडेट्टीवार पृथ्वीराज चव्हाण आणि बाळासाहेब थोरात शिवाय अधून मधून यशोमती ठाकूर यांचे खटके उडत आहेत. पक्ष असलेल्या शरद पवार गटात आता पुढाकार कोणी घ्यायचा हा प्रश्न आहे. शरद पवार हे 85 वर्षाचे आहेत आणि पुढील निवडणुकीपर्यंत त्यांची शारीरिक क्षमता किती असणार हा ही प्रश्न आहे. मुख्य म्हणजे त्यांचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे भाजपच्या उंबरठ्यावर उभे असून कोणत्याही क्षणी ते भाजपामध्ये उडी मारतील अशी अवस्था आहे. म्हणजेच त्यांची सर्वांचीच अवस्था, खेड्यात म्हणतात तशी झाली आहे उघडं नागड्यापाशी गेलं..रात्रभर काकडून मेलं.. अशी झाली आहे. विरोधी पक्षांची फारच वाईट अवस्था असून सध्या सगळ्यांना व्हेंटिलेटर लावला आहे, पण ऑक्सिजन संपत आलेला आहे, आणि हे त्यांच्याही लक्षात आलेले आहे, दुसरे काय ?

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# देशमुख कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे

## हत्या प्रकरणाचा तपास सीबीआयकडे दिला जावा : खा. सोनावणे

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अजित पवारांनी बीडचं पालकमंत्रिपद घेतलं पाहिजे कारण बीडमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात तपास सीआयडीकडे सोपवून काहीही होणार नाही असं खासदार बजरंग सोनावणेंनी म्हटलं आहे. तसंच मागच्या अडची वर्षांच्या काळात बीडचं पालकमंत्रिपद हे धनंजय मुंडेंकडे होतं त्यामुळे जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था ढासळली असाही आरोप बजरंग सोनावणेंनी केला आहे.**



बीड जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. बीडमध्ये काय चाललं आहे हे समजून घ्यायचं असेल तर या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद हे अजित पवारांनी घेतलं पाहिजं. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना पकडण्याचं आश्वासन पोलिसांनी दिलं आहे. मात्र प्रत्यक्षात कारवाई काहीही होत नाही. गेल्या बऱ्याच दिवसांपासून विविध वक्तव्यं येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितलं की आम्ही आरोपींना शिक्षा करु मात्र या प्रकरणाचा तपास पुढे जात नाही. या प्रकरणात सीबीआयकडून चौकशी झाली पाहिजे ही माझी पहिल्या दिवसापासूनची मागणी आहे."संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाला न्याय हवा आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून द्यायचा असेल तर या प्रकरणातील मास्टरमाईंड कोण हे शोधलं पाहिजे. खंडणी प्रकरणात ज्याचं नाव समोर आलं त्यांचा या हत्येशी काही संबंध आहे का हे देखील तपासलं पाहिजे." असंही बजरंग सोनावणेंनी म्हटलं आहे.अडीच वर्षात आधीचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यामुळे जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याचा आरोप खासदार बजरंग सोनवणे यांनी केला. त्यामुळे अंधारात कोण काय काय करतंय हे जाणून घ्यायचं असेल तर अजितदादांनी बीडचे पालकमंत्रिपद घ्यावं अशी मागणी सोनवणे यांनी केली. . संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी झाली पाहिजे अशी मागणी सोनवणे यांनी केली. संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणात अद्याप तीन आरोपी फरारी आहेत. त्यांना पकडण्यात पोलिस दिरंगाई का करतात असा प्रश्नही त्यांनी विचारला.सत्ताधारी पक्षाचे आमदार म्हणतात विष्णू चाटेनी आत्मसमर्पण केले. त्यांनी सरेंडर केले की त्यांना अटक झाली याची माहिती पोलिसांनी द्यावी अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टर माईंड कोण आहे ,त्याला कधी शोधून काढणार? हत्येला १८ दिवस झाले, मग तीन आरोपी अजूनही कसे फरार आहेत असा प्रश्नही सोनवणे यांनी विचारला.बीड जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. बीडमध्ये काय चाललं आहे हे समजून घ्यायचं असेल तर या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद हे अजित पवारांनी घेतलं पाहिजं. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना पकडण्याचं आश्वासन पोलिसांनी दिलं आहे. मात्र प्रत्यक्षात कारवाई काहीही होत नाही. गेल्या बऱ्याच दिवसांपासून विविध वक्तव्यं येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितलं की आम्ही आरोपींना शिक्षा करु मात्र या प्रकरणाचा तपास पुढे जात नाही. या प्रकरणात सीबीआयकडून चौकशी झाली पाहिजे ही माझी पहिल्या दिवसापासूनची मागणी आहे."संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर त्यांच्या कुटुंबाला न्याय हवा आहे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाला न्याय मिळवून द्यायचा असेल तर या प्रकरणातील मास्टरमाईंड कोण हे शोधलं पाहिजे. खंडणी प्रकरणात ज्याचं नाव समोर आलं त्यांचा या हत्येशी काही संबंध आहे का हे देखील तपासलं पाहिजे." असंही बजरंग सोनावणेंनी म्हटलं आहे.अडीच वर्षात आधीचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यामुळे जिल्ह्याची कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याचा आरोप खासदार बजरंग सोनवणे यांनी केला. त्यामुळे अंधारात कोण काय काय करतंय हे जाणून घ्यायचं असेल तर अजितदादांनी बीडचे पालकमंत्रिपद घ्यावं अशी मागणी सोनवणे यांनी केली. . संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना फाशी झाली पाहिजे अशी मागणी सोनवणे यांनी केली. संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणात अद्याप तीन आरोपी फरारी आहेत. त्यांना पकडण्यात पोलिस दिरंगाई का करतात असा प्रश्नही त्यांनी विचारला.सत्ताधारी पक्षाचे आमदार म्हणतात विष्णू चाटेनी आत्मसमर्पण केले. त्यांनी सरेंडर केले की त्यांना अटक झाली याची माहिती पोलिसांनी द्यावी अशी मागणी खासदार बजरंग सोनवणे यांनी केली. संतोष देशमुख यांच्या हत्येचा मास्टर माईंड कोण आहे,त्याला कधी शोधून काढणार?

### काय म्हणाले बजरंग सोनावणे?

हत्येला १८ दिवस झाले, मग तीन आरोपी अजूनही कसे फरार आहेत असा प्रश्नही सोनवणे यांनी विचारला.बीड जिल्ह्यामध्ये कायदा आणि सुव्यवस्था राहिलेली नाही. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. बीडमध्ये काय चाललं आहे हे समजून घ्यायचं असेल तर या जिल्ह्याचं पालकमंत्रिपद हे अजित पवारांनी घेतलं पाहिजं. संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांना पकडण्याचं आश्वासन पोलिसांनी दिलं आहे. मात्र प्रत्यक्षात कारवाई काहीही होत नाही. गेल्या बऱ्याच दिवसांपासून विविध वक्तव्यं येत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही सांगितलं की आम्ही आरोपींना शिक्षा करु मात्र या प्रकरणाचा तपास पुढे जात नाही. या प्रकरणात सीबीआयकडून चौकशी झाली पाहिजे ही माझी पहिल्या दिवसापासूनची मागणी आहे.

# थर्टीफस्टला मिळणार केवळ चार पॅक!

## चार पॅकपेक्षा अधिक दारू कुठल्याही हॉटेलमध्ये मिळणार नाही

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**नवं वर्ष सुरू होण्यासाठी अजून काही दिवस शिल्लक आहेत, मात्र आतापासूनच अनेकांनी नव वर्षाच्या स्वागताचं नियोजन करण्यास सुरुवात केलं आहे. नवं वर्षाच्या स्वागतासाठी अनेकांनी 31 डिसेंबर ते 1 जानेवारी या काळात पार्टीचं आयोजन केलं आहे. काही जण आपल्या कुटुंबासोबत आणि मित्रांसोबत घरीच नव्या वर्षाचं सेलिब्रेशन करणार आहेत.**

तर काही जण मात्र मस्त हॉटेलमध्ये जाऊन दारूचे ग्लास रिचवत नवं वर्षाचं सेलिब्रेशन करण्याच्या बेतात आहेत. नव्या वर्षाच्या स्वागताला हॉटेल आणि रिसॉर्ट्समध्ये जाणं हे आजकाल सामान्य गोष्ट झाली आहे. मात्र ज्यांना हॉटेल आणि बारमध्ये जाऊन नव्या वर्षाचं सेलिब्रेशन करायचं आहे, त्यांच्यासाठी महत्त्वाची बातमी आहे. नव्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये काही नियमांत बदल करण्यात आले आहेत. नव्या नियमांनुसार नव्या वर्षाच्या सेलिब्रेशनसाठी जे हॉटेल किंवा बारमध्ये 31 डिसेंबरला जाणार आहेत, अशा मद्यपींना केवळ चार पॅक एवढीच दारू मिळणार आहे. चार पॅकपेक्षा



अधिक दारू यावेळी कुठल्याही हॉटेलमध्ये मिळणार नाही. याबाबत हॉटेल असोसिएशनकडून माहिती देण्यात आली आहे. नव्या वर्षाचं सेलीब्रेशन करण्यासाठी अनेक जण हॉटेलमध्ये येतात. ते प्रमाणाबाहेर दारू पितात, त्यामुळे त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो. प्रमाणाबाहेर दारू पिल्यास अपघाताचा धोका असतो. जेव्हा लोक दारू पिऊन आपल्या गाडीनं घरी जातात तेव्हा अनेक अपघात होतात. या सर्व गोष्टी लक्षात घेऊन या वर्षी नव वर्षाच्या स्वागताला हा नियम बनवण्यात आल्याचं हॉटेल असोसिएशनकडून सांगण्यात आलं आहे. सरकारकडून नव वर्षाच्या पार्श्वभूमीवर सर्व हॉटेल आणि बारसाठी नवी गाईडलाईन्स जारी करण्यात आली आहे, कोणत्याही ग्राहकाला दारू देण्यापूर्वी त्याच्या वयाबाबत खात्री करून घ्यावी, त्याच्या वयाचा पुरावा त्याच्याकडे मागावा.

### महाराष्ट्रामध्ये काही नियमांत बदल

अल्पवयीन असेल तर दारू देऊ नये. तसेच दारू पिल्यामुळे जर त्याला घरी जाण्यास समस्या असेल तर अशा व्यक्तींसाठी चालकाची सोय करावी. नव्या वर्षाच्या स्वागतासाठी 31 डिसेंबरला सकाळी पाच वाजेपर्यंत सर्व हॉटेल आणि बार सुरू राहणार आहेत, तशी परवानगी देण्यात आली आहे. मात्र त्यासोबतच हॉटेलमध्ये येणाऱ्या ग्राहकांना दारूच्या लिमीटचं बंधन देखील घालण्यात आलं आहे. मात्र ज्यांना हॉटेल आणि बारमध्ये जाऊन नव्या वर्षाचं सेलिब्रेशन करायचं आहे, त्यांच्यासाठी महत्त्वाची बातमी आहे. नव्या वर्षाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रामध्ये काही नियमांत बदल करण्यात आले आहेत.

# आप -काँग्रेस यांच्यात वादाची ठिणगी!

## इंडिया आघाडीतून काँग्रेसला बाहेर काढण्याची तयारी?

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दिल्ली आणि देशातील युतीपासून आम आदमी पार्टी इंडिया आघाडीतून वेगळे होऊ शकते. काँग्रेस नेते अजय माकन यांनी दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना देशद्रोही म्हटल्याच्या वक्तव्यावर संतप्त प्रतिक्रिया आली आहे. आपचे खासदार संजय सिंह म्हणाले की, काँग्रेस 'इंडिया' आघाडीला जर युती मजबूत ठेवायची असेल तर अजय माकन यांच्या वक्तव्याबद्दल 24 तासांच्या आत कठोर कारवाई झाली पाहिजे.**





तसे न झाल्यास 'आप' इंडिया आघाडीतील सर्व पक्षांची भेट घेईल आणि काँग्रेसपासून दूर होण्याची वेगळी मागणी करेल. दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला भाजपकडून पाठिंबा मिळत असल्याचा आरोपही 'आप' ने केला आहे. मुख्यमंत्री आतिशी म्हणाल्या की, काँग्रेसने आजपर्यंत भाजपच्या एकाही नेत्याला देशद्रोही ठरवले नाही याचे कारण काय? तर दिल्ली आणि देशातील सर्वाधिक पसंतीचे नेते अरविंद केजरीवाल यांना देशद्रोही ठरवण्यात आले आहे. केजरीवाल आणि माझ्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. आम आदमी पक्षाबाबत श्वेतपत्रिका जारी करण्यात आली आहे. यावरून काँग्रेस नेत्यांना भाजपकडून पैसे मिळत असल्याचे दिसून येते. अजय माकन यांच्यावर येत्या 24 तासांत काँग्रेस कार्यकारिणीने कारवाई करावी, असे संजय सिंह म्हणाले. तसे झाले नाही, तर माकन यांच्या विधानाला संपूर्ण काँग्रेसचा पाठिंबा आहे, असे मानले जाईल. दिल्लीतील काँग्रेसच्या उमेदवारांची यादी बघा. त्यांनी केजरीवाल यांच्या विरोधात संदीप दीक्षित यांना तिकीट दिले आहे तर जंगपुरा जागेवर मनीष सिसोदिया यांच्यासमोर फरहाद सुरी यांना तिकीट देण्यात आले आहे. ज्यावरून काँग्रेसला आम आदमी पार्टीची मते कोणत्याही प्रकारे कापायची आहेत हे स्पष्ट होते, असे संजय सिंह म्हणाले. दिल्लीत आप आणि काँग्रेस यांच्यात वाद टोकाला जाईल की काय अशी चिन्हं आहेत. कारण इंडिया आघाडीतले हे दोन पक्ष झुंजताना दिसत आहेत. अजय माकन आणि अरविंद केजरीवाल यांच्यातल्या वादाची फोडणी या सगळ्याला बसली आहे. दिल्ली विधानसभा निवडणूक येत्या काही दिवसांत जाहीर होऊ शकते. दरम्यान अजय माकन यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं की आमची ही चूक झाली की दिल्लीत आम्ही केजरीवाल यांच्या पक्षाला पाठिंबा दिला. त्यामुळे काँग्रेसची दिल्लीत दुर्दशा झाली. मात्र अजय माकन यांचे हे म्हणणं आपला मुळीच पटलं नाही. तसंच अरविंद केजरीवाल यांचा उल्लेख अजय माकन यांनी फर्जीवाल असा केला. त्यानंतर आपने आक्रमक पवित्रा घेतला आहे. माकन एवढंही म्हणून गेले की अरविंद केजरीवाल हे राष्ट्रद्रोही आहेत. त्यांच्या कुठलीही विचारधारा नाही त्यांच्याकडे फक्त पदाची महत्त्वाकांक्षा आहे.आप आणि काँग्रेस यांच्यात वादाची ही पेटती भट्टी निर्माण झाल्याने इंडिया आघाडी फुटणार का? हा प्रश्न निर्माण झाला आहे. तसे न झाल्यास 'आप' इंडिया आघाडीतील सर्व पक्षांची भेट घेईल आणि काँग्रेसपासून दूर होण्याची वेगळी मागणी करेल. दिल्ली विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला भाजपकडून पाठिंबा मिळत असल्याचा आरोपही 'आप' ने केला आहे. मुख्यमंत्री आतिशी म्हणाल्या की, काँग्रेसने आजपर्यंत भाजपच्या एकाही नेत्याला देशद्रोही ठरवले नाही याचे कारण काय? तर दिल्ली आणि देशातील सर्वाधिक पसंतीचे नेते अरविंद केजरीवाल यांना देशद्रोही ठरवण्यात आले आहे. केजरीवाल आणि माझ्याविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. आम आदमी पक्षाबाबत श्वेतपत्रिका जारी करण्यात आली आहे. यावरून काँग्रेस नेत्यांना भाजपकडून पैसे मिळत असल्याचे दिसून येते. अजय माकन यांच्यावर येत्या 24 तासांत काँग्रेस कार्यकारिणीने कारवाई करावी, असे संजय सिंह म्हणाले. तसे झाले नाही, तर माकन यांच्या विधानाला संपूर्ण काँग्रेसचा पाठिंबा आहे, असे मानले जाईल. दिल्लीतील काँग्रेसच्या उमेदवारांची यादी बघा.

### नेत्यांनी केजरीवालांना टार्गेट केलं

दिल्लीत मद्य घोटाळा प्रकरणात अरविंद केजरीवाल यांना अटक झाली होती. तेव्हापासूनच दिल्ली काँग्रेसच्या नेत्यांनी अरविंद केजरीवालांना टार्गेट केल्याचं दिसून येतं आहे. दिल्लीत काँग्रेसची सत्ता होती. मात्र मागच्या दोन विधानसभा निवडणुकीत आप ला जबरदस्त मताधिक्य मिळालं होतं. २०१३ मध्ये दिल्लीत काँग्रेसला २४. ६७ टक्के मतं मिळाली होती. २०२० हे प्रमाण ४.६३ टक्के अशा मतांवर आलं. आता काँग्रेसला इथली सत्ता हवी आहे. त्या दृष्टीने अरविंद केजरीवाल यांना टार्गेट करण्यात येतं आहे. मात्र अजय माकन आणि आप यांच्यातला वाद शिगेला गेला आहे. त्यामुळे नेमकं काय होणार ते पाहणं महत्त्वाचं असणार आहे. त्यांनी केजरीवाल यांच्या विरोधात संदीप दीक्षित यांना तिकीट दिले आहे तर जंगपुरा जागेवर मनीष सिसोदिया यांच्यासमोर फरहाद सुरी यांना तिकीट देण्यात आले आहे. ज्यावरून काँग्रेसला आम आदमी पार्टीची मते कोणत्याही प्रकारे कापायची आहेत हे स्पष्ट होते.

## मनमोहन सिंग यांच्या पार्थीवावर अंतिम संस्कार

## पंतप्रधानांसह मान्यवरांकडून डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे गुरुवारी रात्री दिल्लीच्या एम्स रुग्णालयात निधन झाले. त्यानंतर त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी ठेवण्यात आले होते.. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांच्या घरी जाऊन पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले आणि पुष्पांजली अर्पित केली.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील इतर नेत्यांसोबतच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी, शुक्रवारी मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानी जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पुष्पचक्र अर्पित केल्यानंतर मनमोहन सिंग यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करत संवाद साधला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थीवावर उद्या सकाळी ११. ४५ वाजता अंतिम संस्कार होणार आहेत. पहिलं उद्या सकाळी ८ वाजता डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थिवला काँग्रेसच्या मुख्यालयात आणलं जाणार आहे.

त्यानंतर ८.३० ते ९.३० या वेळेत आम जनता पक्षाचे कार्यकर्ते त्यांना श्रद्धांजली वाहणार आहेत. स्टॅनफोर्ड लॉ स्कूलमध्ये प्रोफेसर असलेली डॉ. सिंग यांची लहान मुलगी आज सायंकाळपर्यंत भारतात पोहोचण्याची शक्यता आहे. डॉ. मनमोहन सिंग याच्या निधनामुळे भारत सरकारने ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे.

### 7 दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर

सर्व कार्यक्रम ७ दिवसांसाठी रद्द करण्यात आले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह आणि केंद्रीय मंत्रिमंडळातील इतर नेत्यांसोबतच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी आज, शुक्रवारी मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानी जाऊन श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांनी पुष्पचक्र अर्पित केल्यानंतर मनमोहन सिंग यांच्या कुटुंबियांचे सांत्वन करत संवाद साधला. डॉ. मनमोहन सिंग यांच्या पार्थीवावर उद्या सकाळी ११. ४५ वाजता अंतिम संस्कार होणार आहेत.

# आम्ही पैशासाठी काम करत नसू

बॉलीवूडमधील मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून आमिर खानची ओळख आहे. एकापेक्षा एक चित्रपट व अभिनयाच्या जोरावर निर्माण झालेला चाहतावर्ग, वेगळ्या धाटणीचे चित्रपटाचे विषय आणि भूमिका यासाठी आमिर खान(AAMIR KHAN) ओळखला जातो. तीन दशकांहून जास्त काळ चित्रपटांत काम करत मनोरंजनसृष्टीत महत्वाचे योगदान देणारा अभिनेता म्हणून त्याची ओळख आहे. पण, जेव्हा बॉलीवूडमध्ये पदार्पण केले त्यावेळी आमिर खानची ओळख फार मोठी नव्हती. आता त्याच्या एका सहकलाकाराने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत १९८४ ला प्रदर्शित झालेल्या 'होली' चित्रपटातील शूटिंगदरम्यानची आठवण सांगितली आहे. किटू गिडवानी व आमिर खानने या चित्रपटात स्क्रीन शेअर केली होती. किटू गिडवानी 'होली' चित्रपटातील भूमिका कशी मिळाली, याची आठवण सांगताना अभिनेत्रीने म्हटले, "त्या काळात आमिर खान कोणीही नव्हता. चित्रपट निर्माते केतन मेहता यांनी मला विचारले की तू अलिकडे बहुतेकदा मला फिल्म इन्स्टिट्यूटच्या कॅम्पसमध्ये दिसली आहे. तर मी म्हटले हो मी विद्यार्थ्यांवर चित्रपट करत आहे. त्यानंतर अचानक त्यांनी विचारले तू होली(HOLI)मध्ये काम करणार का? मी त्यांना विचारले की होली काय आहे? तर ते म्हणाले की मी हा चित्रपट करत आहे.

# अनुपम खेर यांनी माजी पंतप्रधानांना वाहिली श्रद्धांजली

अनुपम खेर यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केले असून, त्यांनी सोशल मीडियावर व्हिडीओद्वारे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. या व्हिडीओमध्ये अनुपम खेर यांनी मनमोहन सिंग यांच्याशी झालेल्या भेटीची आठवण काढताना "पगडीतील त्या व्यक्तीची खूप आठवण येईल" असे म्हटले आहे. अनुपम खेर यांनी 'द ॲक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर' या चित्रपटात माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांची भूमिका केली होती. अनुपम खेर यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडीओ शेअर केला. त्यांनी सांगितले, "माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनाची बातमी ऐकून मला खूप दुःख झाले आहे. मी सध्या देशाबाहेर आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या व्यक्तिरेखेला समजून घेण्यासाठी मी दीड वर्ष त्यांचा अभ्यास केला, त्यांचा स्वभाव, वर्तन, आणि वैशिष्ट्ये समजून घेण्याचा प्रयत्न केला."अनुपम खेर यांनी पुढे सांगितले, "एखाद्या व्यक्तिरेखेला साकारण्यासाठी त्या व्यक्तीच्या अंतर्मनात जावे लागते. डॉ. मनमोहन सिंग हे मुळातच चांगले, सौम्य, हुशार, आणि दयाळू होते. जर तुम्ही 'द ॲक्सिडेंटल प्राइम मिनिस्टर' चित्रपट आता पाहिलात, तर तुम्हाला दिसेल की, मी त्यांच्या काही गुणांना समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. सुरुवातीला काही कारणांमुळे मी हा चित्रपट करण्यास नकार दिला होता." ते पुढे म्हणाले, "या सिनेमातील भूमिका मला माझ्या करिअरमधील सर्वांत आवडत्या आणि प्रामाणिकपणे साकारलेल्या भूमिकांपैकी एक वाटते."

# तुला ओळखलच नाही



लिपा ही एक नावाजलेली इंटरनॅशनल सिंगर आहे. जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये तिचे चाहते आहेत. सध्या दुआ लिपा ही वेगळ्याच कारणासाठी चर्चेत आली आहे. तिच्या व्हायरल झालेल्या त्या व्हिडिओवरुन तिला ट्रोल करण्यात आले आहे. त्याचं झालं असं की, बऱ्याच दिवसांनी दुआ लिपा ही पुन्हा भारतात आली आहे. राजस्थानच्या उदयपूर शहरात ती बाजारपेठांमधून फिरत असतानाचे व्हिडिओ आणि फोटो व्हायरल झाल्याचे दिसून आले. मात्र एवढ्या मोठ्या गायिकेला कुणीच ओळखले नाही. यावरुन सोशल मीडियावरील प्रतिक्रिया चर्चेचा विषय आहे. आम्ही या गायिकेला ओळखलेच नाही. असे थेटपणे नेटकऱ्यांनी म्हटले आहे. लिपाचा तो व्हिडिओ आणि फोटो पाहिल्यानंतर एका युझर्सनं लिहिलं आहे की, आम्ही तुला ओळखलंच नाही. तसंही उदयपूर पाहण्यासाठी अनेक विदेशी पाहुणे येतात. त्यात तू येऊन गेली हे आमच्या गावीही नव्हते. आम्हा कुणाच्याच लक्षात ती गोष्ट आली नाही. दुसऱ्यानं लिहिलं आहे की, तू कोण आहेस हे स्थानिक लोकांना माहिती असण्याचे काहीच कारण नाही. ते तुला कसे ओळखणार? तिसऱ्यानं म्हटलं आहे की, अरे त्या लिपाला मुक्तपणे फिरु द्या, तसेही तिला इथं कुणीही ओळखणार नाही. काही दिवसांपूर्वी लिपानं तिच्या कुटूंबियासमवेत दिल्ली दौऱ्याचे फोटो शेयर केले आहेत.

# गोविंदा - सुनीता यांच्या लग्नाला 37 वर्षे



गोविंदा व त्याची पत्नी सुनीता यांच्या लग्नाला ३७ वर्षे झाली आहेत. सुनीता आहुजा फक्त १८ वर्षांची असताना तिने गोविंदाशी लग्न केलं होतं. तेव्हा गोविंदा सिनेसृष्टीत यशस्वी झाला नव्हता. त्यामुळे या जोडप्याने त्यांचे लग्न लोकांपासून लपवून ठेवले होते. आता नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सुनीताने सांगितलं की ती १९ वर्षांची असताना तिची लेक टीनाचा जन्म झाला होता. सुनीताचे वडील तिच्या व गोविंदाच्या लग्नामुळे खूश नव्हते, त्यामुळे ते आले नव्हते, असा खुलासा टीनाने केला. सुनिताचं लग्न झालं तेव्हा गोविंदाचं कुटुंब मोठं होतं, पण ती याच्या उलट वातावरणात वाढली होती. "माझे गोविंदाशी लग्न झाले, तेव्हा त्याचं कुटुंब मोठं होतं. मी फक्त १८ वर्षांची असताना माझे लग्न झाले. टीनाचा जन्म झाला तेव्हा मी १९ वर्षांची होते, त्यामुळे जेव्हा मला मूल झाले तेव्हा मी स्वतःही लहानच होते," असं सुनिता हॉटरफ्लायला दिलेल्या मुलाखतीत म्हणाली. तसेच लग्नाआधीच गोविंदाने सुनिताला सांगितलं होतं की घरात त्याची आई म्हणेल तसंच होईल.त्यावेळी मी माझ्या पतीच्या खूप प्रेमात होते. त्याने मला आधीच सांगितलं होतं की माझे घर माझी आई आहे तोपर्यंत तीच सांभाळेल. ती गेल्यानंतर तुला हवं ते करू शकतेस," असं सुनिता म्हणाली. गोविंदाला बहिणी जास्त होत्या, त्यामुळे त्यांची मुलंही गोविंदाच्या घरी राहायची. "मग मला इतर मुलांची (कृष्णा, विनय) घरात राहण्याची सवय झाली. त्यावेळी ते खूप लहान होते. मला मुलं खूप आवडतात. मला वाटतं की तुम्ही चांगलं काम केलं तर देव ते पाहत असतो, त्या मुलांना जरी त्याची जाणीव नसली तरी," असं सुनिता म्हणाली. सुनीताने हे वक्तव्य भाचा कृष्णा आणि त्याची पत्नी कश्मीराबरोबरच्या वादावरून केलं.सुनिता पुढे म्हणाली,"माझं गोविंदावर खूप प्रेम होतं, त्यामुळं सगळं सहन केलं." त्यानंतर टीनाने तिच्या आईबद्दल सांगितलं. "माझी आई शॉर्ट्स घालायची, पाली हिलमध्ये राहायची, खूप श्रीमंत कुटुंबातून आली होती. त्यावेळी माझे वडील आर्थिकदृष्ट्या इतके सक्षम नव्हते. ते विरारला राहत होते, संघर्ष करत होते. माझ्या आजोबांची परिस्थिती तुलनेने खूप चांगली होती. माझ्या आईने बाबाबद्दल आजोबांना सांगितलं तेव्हा ते म्हणालेले 'अगं तू वेडी आहेस का? तो एक संघर्ष करणारा अभिनेता आहे'. ते यांच्या लग्नालाही आले नव्हते, कारण ते या लग्नामुळे फार खूश नव्हते," असं टीना म्हणाली.

# यश मिळवण्यासाठी कोणतेही शॉर्टकट नाही



अभिनेते रवि किशन, यांनी ४५० हून अधिक भोजपुरी चित्रपटांमध्ये काम केले आहे, तसेच हिंदी चित्रपटसृष्टीतही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे, त्यांनी त्यांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळात अनुभवलेल्या कास्टिंग काउचबद्दल खुलासा केला. ते म्हणाले की त्यांनी किशोरवयात बिहारमधील गाव सोडून मुंबईत येण्याचा निर्णय घेतला. लहानपणापासून त्यांनी खूप गरिबी पाहिली होती, त्यामुळे ते काम मिळवण्यासाठी खूपच प्रयत्नशील होते. या काळात काही लोकांनी त्यांचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी संयम राखला आणि त्यांच्या मागण्यांना कधीच बळी पडले नाहीत. शुभांकर मिश्रा यूट्यूब चॅनेलवरील एका मुलाखतीत रवि किशन यांना विचारण्यात आले की, फिल्म इंडस्ट्रीत पुरुषही लैंगिक अत्याचारांचे बळी ठरतात का? यावर ते म्हणाले, "जेव्हा तुम्ही तरुण, देखणे असता पण तुमच्याकडे पैसा नसतो, तेव्हा काही लोक तुमचा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न करतात. हे फक्त फिल्म इंडस्ट्रीतच नव्हे, तर अनेक क्षेत्रांत घडते. लोक प्रयत्न करतात, आणि त्यांना यश मिळेल अशी अपेक्षा बाळगतात."ते पुढे म्हणाले, " तेव्हा मी सडपातळ होतो, माझे केस लांब होते, आणि मी कानात रिंग घालत असे. तरुणपणी मला अशा अनेक प्रकारांना सामोरे जावे लागले. मी सर्वांना सांगू इच्छितो की यश मिळवण्यासाठी कोणतेही शॉर्टकट नाहीत. अशा शॉर्टकटचा प्रयत्न करणाऱ्या अनेक लोकांना मी पाहिले आहे, आणि त्यांना त्याचा प्रचंड पश्चात्ताप झाला आहे. यातील काही जण व्यसनांच्या आहारी गेले, तर काहींनी आपले प्राण गमवावले." रवि किशन यांनी सांगितले की त्यांनी संयम राखला आणि यश व प्रसिद्धीसाठी सोपी वाट निवडली नाही. ते म्हणाले, "मी कधीही शॉर्टकट पद्धतीने कोणालाही स्टार होताना पाहिलेले नाही.

# तू अशी काय चूक केलीस!

## लायनने केएल राहुलला डिवचल्याचा व्हिडीओ व्हायरल

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मेलबर्नमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या जात असलेल्या कसोटी सामन्याची पहिल्या दिवसापासूनच रोमांचक ठरली आहे. बॉक्सिंग डे कसोटीबद्दल चाहत्यांमध्ये जितकी उत्सुकता होती, तितकाच दोन्ही संघांच्या खेळाडूंनी त्यात मसाला टाकला. पहिल्या दिवशी विराट कोहलीची ऑस्ट्रेलियन सलामीवीर सॅम कॉन्स्टासशी झालेली धक्काबुकी वादग्रस्त ठरली, तर दुसऱ्या दिवशी रोहित शर्माने केएल राहुलला सलामीतून हटवल्याने चर्चेचा विषय ठरला. ऑस्ट्रेलियाचा फिरकी गोलंदाज नॅथन लायनने याचा फायदा उठवण्याचा प्रयत्न केला. ज्याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.**




भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात जेव्हा कधी सामना होतो, तेव्हा स्लेजिंगचा मुद्दा नेहमीच तापतो. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीचा चौथा सामना मेलबर्न क्रिकेट स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यातील दुसऱ्या दिवशी भारताने ऑस्ट्रेलियाला सर्वबाद ४७४ धावांवर रोखले. यानंतर भारतीय संघाच्या डावाची सलामी कर्णधार रोहित शर्माने केएल राहुलच्या जागी यशस्वी जैस्वालसह दिली. मात्र, रोहित शर्मा काही खास करु शकला नाही आणि स्वस्तात परतला. यानंतर केएल राहुल फलंदाजी आला, ज्याला ऑस्ट्रेलियन संघाचा फिरकीपटू नॅथन लायनने डिवचण्याचा प्रयत्न केला.फलंदाजीदरम्यान केएल राहुलला डिवचण्यासाठी नॅथन लायनने रोहित शर्माच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कांगारू संघाच्या फिरकीपटूने केएलला विचारले, 'तू अशी कोणती चूक केलीस की तुला ओपनिंग ऐवजी वन डाऊनला यावे लागले. मला सांग तू काय चूक केलीस?' या घटनेचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने पाच गडी गमावून १६४ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारत अजूनही ३१० धावांनी पिछाडीवर आहे. दुसरा दिवस पूर्णपणे ऑस्ट्रेलियाच्या नावावर होता. तिन्ही सत्रात कांगारूंनी भारतीय संघावर वर्चस्व राखले.शेवटच्या सत्रात कोहली-जैस्वाल फलंदाजी करत असताना, भारताची धावसंख्या दोन गड्यांच्या मोबदल्यात १५३ धावा होती. यानंतर टीम इंडियाने अवघ्या सहा धावात आणखी तीन विकेटिस गमावल्या. यशस्वी जैस्वालचा रनआऊट हा टर्निंग पॉइंट ठरला. यशस्वीने कोहलीसोबत १०२ धावांची भागीदारी केली. मात्र, यशस्वी रनआऊट होताच भारताचा डाव गडगडला. त्याला ८२ धावा करता आल्या. यानंतर विराट कोहली ३६ धावा करून बाद झाला. त्यानंतर नाईट वॉचमन आकाश दीपही खाते न उघडताच पॅव्हेलियनमध्ये परतला.भारत-ऑस्ट्रेलिया यांच्यात जेव्हा कधी सामना होतो, तेव्हा स्लेजिंगचा मुद्दा नेहमीच तापतो. बॉर्डर गावस्कर ट्रॉफीचा चौथा सामना मेलबर्न क्रिकेट स्टेडियमवर सुरू आहे. या सामन्यातील दुसऱ्या दिवशी भारताने ऑस्ट्रेलियाला सर्वबाद ४७४ धावांवर रोखले. यानंतर भारतीय संघाच्या डावाची सलामी कर्णधार रोहित शर्माने केएल राहुलच्या जागी यशस्वी जैस्वालसह दिली. मात्र, रोहित शर्मा काही खास करु शकला नाही आणि स्वस्तात परतला. यानंतर केएल राहुल फलंदाजी आला, ज्याला ऑस्ट्रेलियन संघाचा फिरकीपटू नॅथन लायनने डिवचण्याचा प्रयत्न केला.

### जैस्वालचा रनआऊट हा टर्निंग पॉइंट

फलंदाजीदरम्यान केएल राहुलला डिवचण्यासाठी नॅथन लायनने रोहित शर्माच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. कांगारू संघाच्या फिरकीपटूने केएलला विचारले, 'तू अशी कोणती चूक केलीस की तुला ओपनिंग ऐवजी वन डाऊनला यावे लागले. मला सांग तू काय चूक केलीस?' या घटनेचा व्हिडीओ तुफान व्हायरल होत आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत भारताने पाच गडी गमावून १६४ धावा केल्या होत्या. ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ४७४ धावा केल्या होत्या. त्यामुळे भारत अजूनही ३१० धावांनी पिछाडीवर आहे. दुसरा दिवस पूर्णपणे ऑस्ट्रेलियाच्या नावावर होता. तिन्ही सत्रात कांगारूंनी भारतीय संघावर वर्चस्व राखले.शेवटच्या सत्रात कोहली-जैस्वाल फलंदाजी करत असताना, भारताची धावसंख्या दोन गड्यांच्या मोबदल्यात १५३ धावा होती. यानंतर टीम इंडियाने अवघ्या सहा धावात आणखी तीन विकेटिस गमावल्या. यशस्वी जैस्वालचा रनआऊट हा टर्निंग पॉइंट ठरला.

# दीप्ती शर्माने घडवला इतिहास!

## वेस्ट इंडिजचा पराभव करत मालिका 3-0 ने खिशात घातली

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला क्रिकेट संघाने हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली तिसरा वनडे सामना जिंकत वेस्ट इंडिजला व्हाईट वॉश दिला. या सामन्यात दीप्ती शर्माच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर भारताने वेस्ट इंडिजचा ५ विकेट्सनी धुवा उडवला. दीप्ती शर्माने या सामन्यात ६ विकेट्स घेत विजयात महत्त्वाची भूमिका बजावत इतिहास लिहिला आहे. आता दीप्ती एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक ५ विकेट्स घेणारी पहिली भारतीय महिला गोलंदाज ठरली आहे.**




एकदिवसीय क्रिकेटमध्ये तिच्या नावावर तिनदा पाच विकेट्स घेण्याचा विक्रम झाला आहे.एवढेच नाही तर एकता बिश्तसह तिने झुलन गोस्वामी आणि नीतू डेव्हिडलाही मागे टाकले. या सर्वांनी एकदिवसीय कारकिर्दीत दोनदा पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता. आतापर्यंत, दीप्तीने केवळ ९८ एकदिवसीय सामन्यांमध्ये तीन वेळा पाच विकेट्स घेतल्या आहेत आणि तिच्या नावावर १२३ विकेट्स आहेत. ज्यामध्ये २० धावांत ६ विकेट्स घेणे ही तिची सर्वोत्तम कामगिरी आहे. तिने शमन कॅम्पबेल, चिनेल हेन्री, जाडा जेम्स, आलिया अॅलेने, एफी फ्लेचर आणि अश्मिनी मुनिसर यांना बाद केले.भारत विरुद्ध वेस्ट इंडिज यांच्यातील तिसऱ्या वनडे सामन्यात वेस्ट इंडिजचा संघ प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता. संघाला ५० षटकांचा कोटाही खेळता आला नाही आणि केवळ ३८.५ षटकांत १६२ धावांवर गारद झाला. वेस्ट इंडिजला इतक्या छोट्या धावसंख्येवर रोखण्यात दीप्ती शर्माने सर्वात मोठी भूमिका बजावली. तिने १० षटकात केवळ ३१ धावा देत ६ विकेट्स घेतल्या.

### दीप्तीने 48 चेंडूत 39 धावा केल्या

यानंतर जेव्हा टीम इंडिया धावांचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरली, तेव्हा किती षटकात विजय मिळवणार याची उत्सुक्ता होती. मात्र, यावेळी मंधानाची बॅट चालली नाही आणि ती ४ धावा करून बाद झाली. हरलीन देवललाही एकच धाव करता आली. मात्र, कर्णधार हरमनप्रीत कौरने दुसरी सलामीवीर प्रतिका रावलसह संघाला विजयापर्यंत नेण्याचे काम केले. अखेरीस दीप्ती शर्माने आक्रमक फलंदाजी करत ४८ चेंडूत ३९ धावा केल्या. रिचा घोषने ११ चेंडूत २३ धावा करत संघाला विजय मिळवून दिला.